महाराष्ट्र टाइम्स

# करा बिझनेस एका क्लिकवर

## १००० पेक्षा जास्त ब्रँडस् आणि लाखो उत्पादने सादर करीत असलेल्या 'जस्ट बाय' ॲपमुळे छोट्या रिटेलर्सना जणू वरदानच मिळाले आहे !

केवळ दहा वर्षापूर्वी, स्वत:कडे एखादा हाय-एंड फोन असणे किंवा ऑनलाइन शॉपिंग करता येणे हे केवळ अतिश्रीमंत व प्रतिष्ठितांसाठीच शक्य होते. परंतु आता समाजातल्या प्रत्येकाकडे स्मार्टफोन येऊ लागलेले आहेत आणि भारतातील लाखो व्यक्तींना या सुविधेमुळे वेगवेगळ्या प्रकारे लाभ मिळालेला आहे. पारंपरिक पद्धतीने व्यवसाय करणारा छोटा रिटेलर मात्र तंत्रज्ञानातील या प्रगतीच्या लाटेपासून दूरच राहिलेला होता. त्याच्याकडे लक्ष देण्याची कुणाला गरजही भासली नव्हती आणि त्याला यातून उज्वल भवितव्य मिळू शकेल असेदेखील कोणाला वाटले नव्हते. आज, 'जस्ट बाय लाइव्ह' या रिटेलर्ससाठीच्या जगातील पहिल्या इ-वितरण सुविधेमुळे, केवळ ऑनलाइन खरेदी करणारांच्या बाजूनेच झुकते माप देणारी बाजारपेठ आता पूर्णपणे बदलली आहे. आता छोटा व्यवसाय करणारे दुकानदार आणि कोपऱ्यावरचा वाणी यांनादेखील त्यांच्या भविष्यात काहीतरी चांगले घडण्याची आशा निर्माण झाली आहे.

'जस्ट बाय लाइव्ह'च्या मोबाइल ॲप्लिकेशनमुळे वितरणाची पारंपरिक उतरंडीची पद्धत बदललेली आहे. हे ॲप वापरून रिटेलर्स त्यांना हवा तो स्टॉक कंपनीकडूनच थेटपणे मागवू शकतात, तसे केल्यामुळे त्यांना जास्त व्हरायटी मिळू शकते, अधिक चांगली मार्जिन आणि योग्य प्रमाणात उधारीही मिळू शकते.

या ॲपमुळे अनेक प्रकारचे ब्रँडस् आणि उत्पादने रिटेलर्ससाठी उपलब्ध झाली आहेत. 'हे जणू रिटेलर्ससाठी एक प्रकारचे 'वन-स्टॉप स्टोअर'च आहे.' श्री जैन ट्रेडर्सचे व्यवस्थापक श्री. धीरज जैन यांनी सांगितले. ते म्हणाले, 'जर आम्हाला एखाद्या विशिष्ट ब्रँडच्या डिस्ट्रिब्यूटरकडे प्रवेश मिळत नसेल तरीदेखील काही बिघडत नाही, आम्ही तो ब्रँड या ॲपवरून शोधून काढू शकतो.' आणखी एक फायदा म्हणजे मार्जिन्स. रिटेलर्सना असे दिसून आले आहे की हे ॲप वापरून ते उत्पादने अधिक कमी किंमतीत मिळवू शकतात, आणि हा फायदा ते ग्राहकांनाही देऊ शकतात. 'नेहमीच्या पारंपरिक वितरकांच्या तुलनेत , ॲपवरून मिळणाऱ्या मार्जिन्स खूपच चांगल्या आहेत.' असे गामी एनएक्सचे मालक श्री. शरद वैद यांनी सांगितले. या ॲपचे तिसरे वैशिष्ट्य म्हणजे 'उधार', ज्याद्वारे दुकानदाराला क्रेडिट म्हणजेच उधारी दिली जाते. 'उधार'चा वापर करून दुकानदार उत्पादनांची मागणी नोंदवू शकतात आणि त्याबद्दलचे पेमेंट ३० दिवसांच्या आत, शून्य व्याजासह करू शकतात.



धीरज जैन

### ई - दुकानदार




थोडक्यात सांगायचे तर, भारतातील पारंपरिक पद्धतीने व्यवसाय करणार्या दुकानदारांनादेखील तंत्रज्ञानातील प्रगतीचा फायदा मिळवून देऊन, 'जस्ट बाय लाइव्ह' पारंपरिक रिटेल व्यवसायपद्धतींमध्ये आपली जागा भक्कम करीत आहे हे निश्चित.